## सय

झाली सांज-संध्या
मिटुनी गेली फुले
संधी प्रकाशाने मात्र
कळी होऊन लाजले ||

वाही मंद वारा
संथ वाहते पाणी
लहरत्या लाटांवर
वाऱ्याचीच गाणी ||

पान वाकले दवाने
ओघळून थेम्ब गेले
भिजल्या पानात मात्र
सय साठवून गेले ||

**-- संध्या रानडे**